# “काकडा”

सद्गुरुराया गजानना तंव काकडा करितों ||आतां ||

उद्धारास्तव बहू आदरानें चरणद्वया धरितों || धृ ||

अज्ञानाची निशा मावळो कृपाकटाक्षांनी |

आशा सटवी टी टी करुनी नाचविते अवनी ||१||

त्या सटवीला आहे आसरा मायामोहाचा |

त्याचा टिकाव कधीं न लागे तुज पुढती साचा ||२||

षड्रिपु बेटे खट्याळ मोठे करिती निर्माण |

भ्रमभोंवरा जो त्यामध्यें देतो आम्हांस टाकुन ||३||

त्या भोंवऱ्याला तरुन जाया पाय तुझे नौका |

त्या नावेमध्यें भक्त बैसती तयास टाकुं नका ||४||

दासगणूची हीच विनंती तुज वारंवार |

सुखें करावें भक्ता आपुल्या लोटुं नका दूर ||५||

|| अनंतकोटी ब्रह्मांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी समर्थ सद्गुरु श्रीगजानन महाराज की जय ||